
# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक. ४२२२२२**
Ph. :0253-2231714,15 Ext 2002 http://-ycmou.digitaluniversity.ac
E-mail: mwkchair@ycmou.ac.in



**महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन**

---

**प्रेषक** : प्रा.विजयकुमार पाईकराव

**विषय** : ग्रीष्मशील प्रमाणपत्र परीक्षा कार्यवाही योजनाबाबत...


**प्रति** : मा. कुलगुरू

**दिनांक** : १३/०३/२०२५

---

## !! ग्रीष्मशील प्रमाणपत्र परीक्षा कार्यवाही योजना !!

१. **पार्श्वभूमी :** महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाची स्थापना दि. १५ ऑगस्ट २०१२ रोजी झालेली आहे. नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या मार्गदर्शक तत्वानुसार अध्यासनामार्फत प्रामुख्याने अध्ययनार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांसाठी प्रत्यक्ष व्याख्यानसत्रे , दूरदृश्य वेब रेडीओवरील व्याख्यानसत्रे व परिसंवाद, गीत-काव्य गायन व लेखन, ग्रंथ, पोस्टर व भेटकार्ड प्रदर्शनी आणि ग्रंथभेट इत्यादी उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. त्याच बरोबर प्रागतिक, विज्ञानवादी, ज्ञानात्मक समाजनिर्मितीसाठी अध्ययनार्थी नागरिकांत सक्षमता प्राप्त व्हावी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर लिखित बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथावर आधारित
**"ग्रीष्मशील प्रमाणपत्र परीक्षा"** महाराष्ट्रातील विविध नियोजित केंद्रांवर आयोजित करण्याचा मानस आहे. या करिता "बुद्ध आणि त्यांचा धम्म" या मराठी व इंग्रजी भाषेतील ग्रंथावर प्रामुख्याने शालेय महाविद्यालयीन आणि विद्यापीठीय अध्ययनार्थी व सर्व सामान्य नागरिकांसाठी सशुल्क "ग्रीष्मशील प्रमाणपत्र परीक्षा" १०० गुणांची आयोजित आयोजित करून विद्यापीठामार्फत मूल्यांकन करून सुबक, आकर्षक व प्रेरणादायी प्रमाणपत्र देण्यात येईल.
संपूर्ण महाराष्ट्रातील प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन, प्रतिथयश सेवाभावी संस्था, NGO , विहार आणि ग्रीष्मशील प्रमाणपत्र परीक्षेसाठी किमान २५ अध्यायनार्थीची नोंद करू इच्छिणाऱ्या सेवावृती गृहिणीस किंवा व्यक्तीस या परीक्षेचे अधिकृत केंद्रसमन्वयक म्हणून अध्यासनातर्फे मान्यता देण्यात येईल, महाराष्ट्रातील सुमारे ३५८ तालुके व ३६ जिल्ह्यात किमान १ अभ्यासकेंद्र देण्यात येईल.या प्रमाणे दरवर्षी सुमारे १०००० अध्ययनार्थी, गृहिणी, सेवानिवृत्तव्यक्ती,जेष्ठ नागरिक या ग्रीष्मशील प्रमाणपत्र परीक्षेसाठी दरवर्षी प्रवेश घेतील असे अपेक्षित आहे. एवढ्या मोठ्या संख्येने या परीक्षेची कार्यवाही करताना त्याची गुणवत्ता राखतात यावी यासाठी ही कार्यवाही योजना तयार करण्यात आलेली आहे. या पूर्वी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ग्रामगीतेवर अशी परीक्षा अध्यासनाच्या वतीने घेतली जात होती. त्याशी सुसंगती ठेवूनच ही योजना सादर केलेली आहे. त्यास मान्यता द्यावी ही विनंती आदर व आभारासह !!!



**२.२. उदिष्टे :**

ग्रीष्मशील प्रमाणपत्र परीक्षेची उदिष्ट्ये पुढीलप्रमाणे निर्धारित करण्यात आलेली आहेत.

२.१. अध्ययनार्थींना बुद्ध आणि त्यांचा धम्म या ग्रंथामधील मूलभूत वैज्ञानिक संकल्पनांचा परिचय करून देणे.

२.२. अध्ययनार्थींना दैनंदिन जीवनात समाजशील सहकार्यशील व पर्यावरण पूरक नवोपक्रम व प्रयोग करण्यासाठी प्रवृत्त करणे.

२.३. अध्ययनार्थींना ज्ञानात्मक समाज निर्मितीची नवीन कौशल्ये वापरण्यास प्रवृत्त करणे.

२.४. अध्ययनार्थींत सुज्ञ नागरिकत्वासाठी आवश्यक ते ज्ञान, अभिवृत्ती, कौशल्ये व दृष्टिकोन विकसित करणे.

**३. ग्रीष्मशील प्रमाणपत्र परीक्षा परीक्षेची रूपरेषा व स्वरूप** :

३.१. किमान कालावधी : ३-६ महिने ( मात्र जिज्ञासू , अनुभवी, ज्ञानी अभ्यासकांना परीक्षेपूर्वी नोंदणी करता येईल .)

३.२. एकूण स्वयं अध्यायन तास : ३०० तासिका

३.३. अभ्यास विषय : बुद्ध आणि त्यांचा धम्म ग्रंथ

३.४. मूल्यमापन : १०० गुण लेखी परीक्षा

३.५. पूरक व्याख्यान सत्रे / परिसंवाद : सत्रे इ.

**४. ग्रीष्मशील प्रमाणपत्र परीक्षा कार्यवाही योजना :**

४.१. **अभ्यासकेंद्राची निवड :**

४.१.१. सदर परीक्षेची कार्यवाही पुरेशा संख्येनी निवडलेल्या अभ्यास्केंद्रामार्फत केली जाईल. साधारणत: प्रत्येक तालुक्यात ठिकाणी आणि पंचक्रोशीतील गावात सुद्धा मागणी केल्यास सदर अभ्यासकेंद्र सुरु करण्यात येईल .

४.१.२.त्या करिता आवेदनपत्रा बरोबर रु.५०० /- प्रक्रिया शुल्क घेण्यात येईल. हे शुल्क Online किंवा धनकर्ष (डी.डी) द्वारे वित्त अधिकारी, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्तविद्यापीठ नाशिक. ह्यांच्या खात्यावर भरण्यात येईल.

४.१.३.प्रत्येक अभ्यास केंद्रावरील किमान एका समन्वयकांचे / सामंत्रकांचे उदबोधन प्रशिक्षण विद्यापीठामार्फत घेण्यात येईल. ते प्रत्यक्ष किंवा दूरदृश्य झूम मध्यमा मार्फत घेण्यात येईल. त्या करिता पहिल्यावेळी किमान २५ अध्ययनार्थींनी प्रवेश सशुल्क नोंद करणे अपेक्षित आहे.

**४.२. अभ्यासकेंद्रावरील अपेक्षित सुविधा :**

४.२.१. अभ्यासकेंद्र समन्वयकांसाठी चर्चा, परिसंवादासाठी एक खोली व पुस्तकांसाठी एक संगणक, लॅपटॉप, टेबल खुर्ची किमान २५-३० व्यक्ती बसतील या साठी कक्ष किंवा समाजमंदिर / विहार शाळेची खोली इ.

**४.३. अभ्यासकेंद्राची कार्ये** :

४.३.१. अध्ययनार्थींना प्रवेशपूर्व मार्गदर्शन, सामंत्रण माहिती देणे.

४.३.२. उचित शुल्क घेऊन अध्ययनार्थींचा प्रवेश निश्चित करणे, (प्रवेश अध्ययन साहित्यासह रु. २०० /-

आणि प्रवेश अध्ययनसाहित्याविना रु. १०० /- )

४.३.३. संपर्क सत्रे व परिसंवादाचे आयोजन करणे.

४.३.४. परीक्षेचे आयोजन करणे.

४.३.५. तज्ञानमार्फत उतरपत्रिकांचे मूल्यांकन करून गुणदान तक्ते विद्यापीठाकडे पाठवणे.

४.३.६. मानधनाचे उचित वितरण करणे .

४.३.७. ग्रीष्मशील प्रमाणपत्र परीक्षेचा प्रचार प्रसार, माहिती सर्वांपर्यंत पोहचवणे.

४.३.८. विद्यापीठाने वेळोवेळी निर्धारित केलेली अन्य कार्य करणे.

**५. शैक्षणिक वेळापत्रक :**

५.१. किमान ३ महिने व कमाल ६ महिने कालावधीत सोयीप्रमाणे,

५.२. संपर्कसत्र व उदबोधन वर्ग एक दिवसाचे

५.३. अंतिम लेखी परीक्षा इ. ३.तासाची आयोजित करणे.

५.४.यात केंद्राच्या सोयीप्रमाणे थोडा बदल करण्यातस परवानगी देण्यात येईल.

**६. प्रवेश :**

६.१. प्रवेशइच्छुक अध्ययनार्थी किमान मराठी साक्षर असावा. ( लिहिता वाचता येणारा)

६.२. प्रवेश शुल्क : अध्ययन साहित्यासह रु. २००/- किंवा अध्ययन साहित्याविरहित रु. १०० /- रोख किंवा अभ्यास केंद्रावरील सोई-सुविधे प्रमाणे Online सुद्धा भारता येईल.

६.३.अभ्यासकेंद्र मार्फत एकत्रित प्रवेशशुल्क Online किंवा धनाकर्ष (D.D) मार्फत सत्वर वित्त विभागात / बँकेत पाठवण्यात येईल. प्रती अध्ययनार्थी रु.३० /- प्रमाणे.

६.४. अभ्यासकेंद्र व्यवस्थापकीय, प्रशासकीय, स्टेनरी, परीक्षा आयोजन खर्च व मानधन रु. ७० प्रती अध्ययनार्थी प्रमाणे .

**७. परीक्षेची कार्यवाही** :

७.१. परीक्षेसाठी लेखी प्रश्न पत्रिका Online Pdf स्वरुपात अभ्यासकेंद्र समन्वयकांकडे पाठवण्यात येतील. त्यांनी त्याच्या आवश्यकतेनुसार बहुप्रती काढून परीक्षा कक्षात अध्ययनार्थींस द्याव्यात

७.२.उत्तर पत्रिकेसाठी A 4 रुलिंग पेपरचा वापर करावा, त्याच्या प्रथम पृष्ठावर अभ्यास केंद्राचा शिक्का ठळक स्वरुपात दिसेल असा उमटवावा किंवा तसा प्रकारचा मोठा शिक्काच करून घ्यावा .

| |
|---|
| यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक<br><br>ग्रीष्मशील प्रमाणपत्र परीक्षा उत्तर पत्रिका<br><br>परीक्षार्थीचे नाव :-<br>परीक्षा क्र. :-<br>दिनांक :-<br><br>पर्यवेक्षकांची स्वाक्षरी |

७.३.परीक्षेनंतर सर्व उत्तरपत्रिका विद्यापीठाने निश्चित केलेल्या मान्यताप्राप्त त ज्ञ परीक्षकाकडून मूल्यमापन करून त्याचा एकत्रित गुणनोंद तक्ता अध्यासनाकडे पाठवावा. त्यानुसार ज्ञानगंगोत्री मुख्यालयातून प्रमाणपत्रे केंद्रावर पाठवण्यात येतिल .

७.४. अभ्यासकेंद्रांनी प्रमाणपत्रे वितरणाचा छोटे स्वरुपात कार्यक्रम आयोजित करून यशस्वी अध्ययनार्थीस प्रमाणपत्रे, महनीय व्यक्तींच्या हस्ते प्रदान करण्याचा कार्यानंद समन्वयकांचा असेल. तसेच त्याची बातमी स्थानिक वृत्तपत्रात आणि समाज माध्यमात देण्यात यावी.

**८. ग्रीष्मशील प्रमाणपत्र परीक्षेचे फायदे :**

८.१. अध्ययनार्थी हा ज्ञानात्मक समाज निर्मितीसाठी सक्षम होईल.

८.२. अध्ययनार्थीत वैज्ञानिक दृष्टकोणाची रुजवणूक होईल.

८.३. अध्ययनार्थीत सृजनात्मक उपक्रमची पायाभरणी करण्यात येईल.

८.४. समाजातील महनीय नेत्यांच्या समाज पुरुषांच्या जयंती-मयंतीच्या कार्यक्रमावेळी व्यर्थ गोंगाट, डीजे व इतर समाज विघातक कृतींना निश्चितच आळा बसेल असा विश्वास आहे.

८.५. अध्ययनार्थीत मूल्यांची रुजवणूक होईल.

[signature] ३/३/२०२५

प्रा.विजयकुमार पाईकराव

प्रमुख,महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन

मा. वित्त अधिकारी,

१. महाकवी वामनदादा कर्डक अध्यासनाच्या अर्थसंकल्पीय नियोजित निधीतील किमान रु.५००००/- हजाराची आर्थिक तरतूद या करिता करण्यात यावी.ही विनंती.

२. प्राप्त शुल्क रु.५०/-प्रती अध्ययनार्थी घेण्यात येईल ते महाकवी वामनदादा कर्डक अध्यासन, ग्रीष्मशील परीक्षा या शीर्षका अंतर्गत घेण्यात यावे ही विनंती.

F.O

मा.कुलगुरू

[signature] ३/३/२०२५

सादर

उपरोक्त क्रं प्रमाणे प्रस्तावित खर्च व शुल्कार्यांकारणी करवास मान्यता मिळणासाठी अग्रेषित

[signature]

मान्य

[signature] २४/३/२५

मा. कुलगुरू महोदय